# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती उत्साहात साजरी

वडाळा:

श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. हा दिवस भारतामध्ये *"राष्ट्रीय एकता दिवस"* म्हणून साजरा करण्यात येतो. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यार्थी स्वप्निल मुळे याने सरदार वल्लभभाई पटेल यांचा परिचय व जीवन प्रवास सांगितला. सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी अभूतपूर्व योगदान दिले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संपूर्ण राष्ट्राला एकत्र आणण्याची महत्त्वाची भूमिका बजावली. यामुळेच सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात येते, अशी माहिती विजतंत्री विभागाचे निदेशक श्री संभाजी जाधव सर यांनी आपल्या मनोगतामधून विद्यार्थ्यांना दिली. लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य माननीय योगेश गायकवाड सर यांनी मनोगत व्यक्त करताना सरदार वल्लभ भाई पटेल याच्या कणखर व्यक्तिमत्व, राजनीतिक दूरदर्शीपणा या व्यक्तिविशेषातून एकसंघ राष्ट्र निर्मितीसाठी भरीव योगदान या वरती दृष्टीक्षेप टाकला, व यांना लोहपुरुष पदवी का देण्यात आली, त्यांचा जीवन प्रवास आणि राजकीय आयुष्याबद्दल माहिती सांगितली. गुजरात मधील छोट्याशा खेड्यामध्ये जन्मलेले वल्लभभाई पटेल ते स्वतंत्र भारताचे पाहिले उपपंतप्रधान इथपर्यंतच जीवन प्रवास उलगडून सांगितला. ५६५ अर्धस्वयत्त संस्थानांचे भारतात विलगीकरण करण्यामध्ये सरदार वल्लभाई पटेल यांची महत्त्वाची भूमिका कशी होती या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सूत्रसंचालन विद्यार्थी स्वप्निल मुळे यांनी केले. तसेच कार्यक्रमासाठी ११० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



